स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय, विरार
विरार (प.),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./मा.तं./17/25-26
दिनांक : 15/04/2025

# प्रेसनोट

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसाच्या कृती आराखडयातील ७ कलमी उपक्रमा अंतर्गत **Tree Cutting and Trimming Permission Management System, Fire NOC Management System, Life Certificate System, Mahila Balkalyan Scheme Management System** व **WhatsApp Chatbot** व कार्यान्वीत करुन नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

वसई विरार क्षेत्रातील नागरिकांना **वृक्ष तोड ना-हरकत दाखला, अग्निशमन ना-हरकत दाखला व हयाती दाखला** प्राप्त करुन घेणे कामी, तसेच महिला बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभा घेणे करीता वसई विरार कार्यालयात भेट देण्याची आवश्यकता भासणार नसून, सदर दाखले घरबसल्या ऑनलाईन उपलब्ध करुन घेता येतील.

१. **Tree Cutting and Trimming Permission Management System** - सदर प्रणाली द्वारे नागरिकांना वृक्ष तोड ना-हरकत दाखला जसे की - वृक्ष छाटनी परवानगी, वृक्ष तोड परवानगी बाबतचे दाखले ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करुन घेता येतील.
   (**प्रणाली लींक** - https://rtsvvmc.in/tree)
२. **Fire NOC Management System** - सदर प्रणालीद्वारे व्यावसायीक आस्थापना उदा. हॉटेल, हॉस्पीटल, औद्योगीक आस्थापनांना व इतर आस्थापना अग्निशमन ना-हरकत दाखला सदर प्रणालीद्वारे उपलब्ध करुन घेता येईल.
   (**प्रणाली लींक** - https://firenoc.rtsvvmc.in)
३. **Life certificate system** - सदर प्रणाली द्वारे नागरिक (दिव्यांग नागरिक, वयोवृद्ध नागरीक, पेंशनधारक नागरीक) विविध योजनांचा लाभ घेणेकरीता आवश्यक असणाऱ्या हयातीचा दाखल्या करीता महापालिकेच्या कार्यालयात भेट न देता सदर प्रणाली मार्फत घराबसल्या ऑनलाईन उपलब्ध करुन घेता येईल.
   (**प्रणाली लींक** - https://rtsvvmc.in/life_certification)
४. **Mahila Balkalyan Scheme Management System** – वसई विरार महापालिकेच्या महिला बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ ऑनलाईन पद्धतनी मिळणेकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी वसई विरार क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांनी ऑनलाई सुविधेचा लाभ घ्यावा.
   (**प्रणाली लींक - https://mahilabalkalyan.rtsvvmc.in/**)

५. **WhatsApp Chatbot-** वसई विरार क्षेत्रातील नागरिकांना महापालिके संबंधित माहिती व सुविधा WhatsApp Chatbot द्वारे त्वरीत उपलब्ध करुन घेता येईल.
**(WhatsApp Chatbot No- ९६६५८७७७२७)**

वसई विरार क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांनी उक्त ऑनालाईन सुविधांचा लाभ घ्यावा व महापालिकेस सहकार्य करावे असे - मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन.

सही/-
(समीर भुमकर)
उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका